Shree Printers Page No.

साहित्यविचार सेमी V

पेपर X वा

प्रा सौ. कांबळे एस. एस.

शब्दशक्ती विचार ⇒

शब्दांना साहित्यरचनेत महत्वाचे स्थान प्राप्त आले आहे. त्यामुळेच शब्दाच्या ठिकाणी असलेल्या शक्तीचा ऊहापोह मीमांसकांनी करून त्यांच्या काही जाती. कल्पिल्या आहेत. शब्दांना साहित्यरचनेत शरीराचा दर्जा देण्यात येतो.

शब्दाच्या ठिकाणी असलेल्या शक्तीमुळे शब्दांना अर्थ प्राप्त होतो. काव्याच्या ठिकाणी ज्या शब्दशक्तीमुळे सौंदर्य निर्माण होते. त्या शब्दशक्तीचा शोध हा काव्यशास्त्रातील एक महत्वाचा विषय मानला गेला आहे. याशिवाय अलंकारशास्त्रामध्ये शब्दाच्या विविध शक्ती आणि त्यांच्यामुळे शब्दांना प्राप्त होणारे अर्थ याचा विचार करावा लागतो

शास्त्रामध्ये शब्दाला प्राधान्य असते. काव्यामध्ये शब्द आणि अर्थ या दोघांनाही गौणत्व असून कवी व्यापाराला प्राधान्य असते. काव्यातील शब्दांना कवी व्यापारामुळे वाच्यार्थाहून वेगळा अर्थ प्राप्त होतो.

शब्द म्हणजे पदार्थाचे प्रतीक 'वृक्ष' हा शब्द वृक्ष या पदार्थाचे प्रतीक आहे. हा शब्द उच्चारताच विशिष्ट आकृतीची वस्तु आपल्या डोळ्यासमोर येते. शब्दाच्या ठिकाणी ही जी शक्ती आहे. तिलाच अभिधा शब्दशक्ती असे म्हणतात. या शक्तीमुळे शब्दांना जो अर्थ प्राप्त होतो. तो वाच्यार्थ होय. पण कित्येक वेळा त्याचा उपयोग होत नाही. अशावेळी अर्थाचे ग्रहण

वेगळ्याच शक्तीचा आश्रय घ्यावा लागतो. उदा. तू राक्षस आहेस - असे एखाद्या माणसाला उद्देशून म्हटल्यास राक्षस या शब्दाच्या वाच्यार्थ उपयोगी पडणार नाही. इथे राक्षस या शब्दाने क्रूरकर्म करणारा माणूस असा अर्थ सूचवायचा आहे. याच अर्थाने असे अनेक वाक्य वापरले जातात. तू पशू आहेस. तो वाघ आहे. ती गाय आहे. वगैरे घरावरुन हत्ती गेला या वाक्यात घरावरुन म्हणजे रस्त्यावरुन अथवा घरासमोरुन हत्ती गेला असाच अर्थ घ्यावा लागतो. शब्दाची ही जी शक्ती ती लक्षणा होय. आणि या शक्तीने व्यक्त केलेला अर्थ म्हणजे लक्ष्यार्थ होय. पण कित्येक वेळा एवढ्यानेही भागत नाही. शब्दाचा उच्चार करताच आपल्या मनात वाच्यार्थ तर उरतोच पण त्याहीपेक्षा भिन्न व्यापक अशा वेगळ्या अर्थाची सूचना मिळते. या सूचनेला काव्यात फार महत्व आहे. शब्दाची जी शक्ती ती व्यंजना होय हा अर्थ सूचित होतो.
'गंगानाम घोष': या पदावलीत गंगेमध्ये असलेला घोष म्हणजे वाडा असा अर्थ घेता येणार नाही. गंगेमध्ये घोष कसा असू शकेल? गंगेमध्ये म्हणजे गंगेच्या काठावर हा अर्थ लक्षणेने प्राप्त होतो. या बाबत काव्यशास्त्रकार डॉ. गाडगीळ स्पष्ट स्पष्टीकरण करतात ते असे.
'बुद्धगयेचा पिवळा वारा' या मढेकरांच्या उक्तीमध्ये लक्षणा आणि व्यंजना या दोन्ही शब्दशक्तीचा सुंदर संयोग आढळतो. 'पिवळा' हा शब्द बुद्धभिक्षुंनी परिधान केलेल्या पीतवस्त्रासाठी आलेला आहे. ही लक्षणा झाली. पण पिवळा म्हणजे केवळ पीतवस्त्र एवढेच कवीला सांगायचे नाही. बुद्धाच्या निवासाने पवित्र झालेली बुद्ध गया भारतीयांचे क्षेत्रस्थानी गंगा नदीवरुन वाहत येणारा पिवळा वारा

Shri Printers Page No.

पाविक्र्याचे उदात्त वातावरण निर्माण करतो. तो केवळ वारा रहात नाही. बुद्धाला ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली. त्या ठिकाणाचे महत्त्व तो 'पिंपळ वारा' ध्वनित करतो.

अशा प्रकारे शब्दाच्या तीन शक्ती अभिधा, लक्षणा, व्यंजना भारतीय साहित्यशास्त्रात मानल्या जातात.

(1) अभिधा - (वाच्यार्थ)

शब्दाची पहिली व मुख्य शक्ती म्हणजे अभिधा होय. कोणताही शब्दाचा सरळ व त्याचे उच्चारण झाल्याबरोबर मनात उतरणारा असा जो अर्थ तो त्याचा मुख्य अर्थ होय. त्यालाच वाच्यार्थ म्हणतात. असा अर्थ वाच्यार्थ प्रकट करण्याची शक्ती प्रत्येक शब्दात असते. असे मानले जाते. व तिला अभिधा असे नाव दिले जाते.

अभिधेचे प्रकार :- अभिधेचे तीन प्रकार मानले जातात.

(1) योग अभिधा :→

योग म्हणजे व्युत्पत्ती व्युत्पत्तीने जेव्हा शब्दाचा अर्थ सिद्ध होतो. तेव्हा त्या शब्दशक्तीला योगशक्ती म्हणतात. आणि त्या शब्दांना यौगिक म्हणतात. उदा. पाठक, गांगेय, भारतीय दर्शनीय

(2) रूढी अभिधा :- शब्दाची जी शक्ती रूढीने प्रस्थापित झालेली असते. म्हणजे या शब्दातील वर्णसमूहाला रूढीने अर्थ प्राप्त झालेला असतो.

उदा. मंडप, गृह, झाड, अश्व इ. अर्थ.

3) योगरूढ अभिधा :→ काही शब्दाच्या अर्थ व्युत्पत्ती प्रमाणे न होता रूढीने निश्चित केलेला असतो. उदा. पंक पंक म्हणजे चिखल. चिखलात जे जे निर्माण झाले. ते असा व्युत्पत्तीने अर्थ होता पण पंकज म्हणजे कमळ असा आपण रूढीने अर्थ प्राप्त होतो. 'खग' या शब्दाचा अर्थ आकाशात गमन करणारा असा होतो. पण खग म्हणजे उडणारे पक्षी असाच आपण

Shree Printers Page No.

खग म्हणजे केवळ उडणारे पक्षी अर्थ होतो पण खग म्हणजे केवळ उडणारे पक्षी असाच आपण अर्थ घेतो अशा शब्दांना योगरूढ अशी संज्ञा आहे

## अभिधा शब्दशक्तीचे वैशिष्ट्ये / महत्व

1) शब्दाचा उच्चार केल्याबरोबर जो अर्थ आपल्याला कळतो तो अभिधा शक्तीमुळेच शक्य होते.
2) वाच्यार्थ अभिधाशक्तीमुळे प्राप्त होतो.
3) आपला भाषिक व्यवहार अभिधा शक्तीवरच चालत असतो.
4) शब्दाच्या समाजात प्रचलित किंवा रूढ असलेला अर्थ ज्या शब्दशक्तीमुळे कळतो तो अभिधा शक्ती होय.
5) आपला दैनंदिन भाषिक व्यवहार हा अभिधा या शक्तीवरच चालत असतो.
6) शास्त्रीय वाङ्मयात अभिधाशक्तीचे साम्राज्य असते.

## 2) लक्षणा :- (शब्दशक्ती लक्ष्यार्थ)

व्याख्या : "जेव्हा शब्दाचा वाच्यार्थ लागत नाही, तो बाधित होतो. आणि शब्दाचा दुसराच अर्थ आपल्या लक्षात येतो त्या अर्थाला लक्ष्यार्थ असे म्हणतात. आणि हा अर्थ देणाऱ्या शब्दशक्तीस लक्षणा असे म्हणतात.

उदा. जेवणाची पाने वाढून तयार झाली की आपण म्हणतो, चला पानावर बसा या ठिकाणी 'पानावर' याच्या शब्दशः अर्थ घेतला तर अनर्थ होईल. म्हणून त्याचा अर्थ 'पानासमोरील' किंवा 'पाटावर' असे म्हणतो. 2) आम्ही गहू खातो म्हणजेच गव्हापासून तयार केलेले पदार्थ खातो. असे म्हणावे लागेल.

शेडक्यात शब्दाच्या मूळ अर्थाला बाधा येत असेल तर त्याला जुळलेला दुसरा अर्थ घ्यावा लागतो. या शब्दाच्या शक्तीस लक्षणा असे म्हणतात. लक्षणेने लक्ष्यार्थ सुचीत करीत असलेल्या शब्दाला लाक्षणिक म्हणतात. लक्षणा ही क्रमाने दुसरी शब्दशक्ती असून वाक्यार्थाचा बोध होण्यासाठी काही वेळा मुख्यार्थाचा (वाच्यार्थाचा) उपयोग होत नाही. अशावेळी गौण अर्थ लक्षात घ्यावा लागतो. यालाच लक्ष्यार्थ म्हणतात.

उदा. 'घरावरून हत्ती गेला' या वाक्यात शब्दाच्या मुख्य अर्थ लक्षात घेतल्यास शब्दाचा अर्थ कळत नाही. केवळ येथे 'घरावरून' हा मुख्यार्थ न घेता, 'घरासमोरून' हा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. 'मी महात्मा फुले वाचले' असे म्हणताना त्यांचे साहित्य वाचले असा आपण अर्थ घेतो 'तू राक्षस आहेस' या वाक्यातून त्या व्यक्तीची क्रूरता सूचीत होते. लक्षणेमध्ये समिपता सहचर्य सादृश्य इत्यादि संबंधामुळे लक्ष्यार्थ समजू शकते. आपण समीपता दाखवण्यासाठी बोलतो. त्याप्रमाणे बोलण्याच्या अर्थ विलक्षण होण्यासाठी रमणीच्या मुखाला चंद्राची व कमळाची उपमा देताना सौंदर्य हेच अधिष्ठान असते. चमत्कृतीपूर्ण अलंकाराच्या कवीच्या हेतू असतो. कधी कधी कवीचा हेतू स्त्रीमुळे नाहीसा होतो. पुढे-पुढे मूळ प्रयोजन नाहीसे होऊन लक्ष्यार्थ हाच मुख्यार्थ बनतो.

उदा. कुशल म्हणजे चतुर, निपुण. पण कु म्हणजे दर्भ तोडणारा नो दर्भकु हा लक्ष्यार्थ होय.

लक्षणेचे प्रकार :

1) निरूढा लक्षणा

2) प्रयोजनवती लक्षणा

1) निरूढा लक्षणा :→ मूळ शब्दाच्या पाठीमागे जो हेतू असतो तो काळाच्या ओघात नाहीसा होतो. आणि त्या शब्दाचा सध्या असणारा अर्थ मुख्यार्थ नसतो. कित्येकवेळा

Shree Printers Page No.

लक्षक शब्दाच्या पाठीमागील प्रयोजन कालांतराने नाहिसे होते. व लक्ष्यार्थ हाच मुख्यार्थ बनतो.
उदा. कुशल या शब्दाचा अर्थ निपुण असा धरला जातो. हा मूळ संस्कृतीच्या काळातील
हाच मुळात लक्षक आहे. पण सध्या त्याचा अर्थ पारंगत असा होतो.
याचा अर्थ गवत असा आहे. मुळातील लक्ष्यार्थ आता मुख्यार्थ बनला आहे. तारांबळ उडणे याचा मुख्य अर्थ नवविवाहितांच्या पाठीमागे सर्व गृहांचा आशीर्वाद असा आहे. व त्याच्या सध्याचा अर्थ गोंधळ असा होतो.
म्हणजे मूळातील लक्ष्यार्थ मुख्यार्थ बनतो.

निरुढा लक्षणेत लक्षक शब्द हे कालांतराने मुख्यार्थ स्वीकारतात. लक्ष्यार्थ व मुख्यार्थाची जागा होते. त्यातील प्रयोजन नाहिसे होते. कोणतेही वस्तू सतत वापरून तिची झीज होते. मुळातील शब्दाचा अर्थ झिजून ते शब्द वाचक बनतात. म्हणजेच लक्षक शब्द वाचक बनतात. यालाच मृत रुपक असे म्हणतात.

2) प्रयोजनवती लक्षणा :-

लक्षणा शब्दशक्तीचे खरे क्षेत्र येथे. वाच्यार्थाला बाजूला सारून त्याच्याशी संलग्न असलेला दुसरा अर्थ स्वीकारायला काहीतरी कारण हेतू प्रयोजन असावे लागते. असे प्रयोजन असलेल्या लक्षणेला प्रयोजनवती लक्षणा असे म्हणतात.

सामान्यतः हे प्रयोजन कधी स्पष्ट होते असते तर कधी गूढ असते. जेव्हा प्रयोजन गूढ असते तेव्हा लक्षणेत अधिक सौंदर्य जाणवते.

उदा: घरावरून हत्ती गेला ही सगळी उदाहरणे प्रयोजनवती लक्षणेची आहेत.

प्रयोजनवती लक्षणेचे प्रकार :-

अ) गौणी लक्षणा

ब) शुद्धा लक्षणा

अ) गौणी लक्षणा :- जेव्हा लाक्षणिक अर्थ गुणांवर आधारलेला असतो तेव्हा गौणी

मानली जाते.

गौणी लक्षणेचे प्रकार

आरोपागौणी लक्षणा | साध्यावसना गौणी लक्षणा

1) सारोपा गौणी लक्षणा :→ आई वडिल दैवत नसून माणसेच दैवत आहेत. हे आपणास माहित असते. पण दैवताचे गुण त्यांच्या अंगी आहे. जसा देव भक्ताची काळजी घेतो तसे आईवडिलही मुलांच्या कल्याणासाठी असतात. हे सांगण्यासाठी हा लक्ष्यार्थ योजला आहे. म्हणून ही गौणी आणि या आई-वडिलांवर त्या गुणांच्या आरोप करायला त्यांच्या प्रत्यक्ष निर्देश त्या ओळीत केलेला आहे. म्हणून ही सारोपा गौणी लक्षणा होय.

2) साध्यावसना गौणी लक्षणा :→
कधी - कधी ज्यांच्या संदर्भात या गुणाच्या उल्लेख करायचा त्या व्यक्तीचा प्रत्यक्ष निर्देश केलेला नसतो. व्यापमान्या आठा या पदमा गोळेच्या कवितेत वाच्यार्थ बोध असल्याने लक्षणा आहे.

ब) शुद्धा प्रयोजनवती लक्षणा
हा प्रयोजनवती लक्षणेचा दुसरा प्रकार होय. गौणी लक्षणा गुणावर आधारलेली असते. तर शुद्ध लक्षणेमध्ये गुणाच्या काहीही संबंध नसतो. शुद्धा लक्षणेमध्ये आधाराधेय स्वामीसेवक, कार्यकारण, सामीप्य, सदृश्यजन्मक इत्यादी संबंधी माहिती असते.
उदा: घरावरून हत्ती गेला, त्याच्या व्याख्यानाला अख्खा गाव लोटला. मी केशवसुत वाचला इत्यादी वाक्यही याच प्रकारचे आहेत.

शुद्धा लक्षणेचे प्रकार

i) आरोपा शुद्धा
ii) साध्यावसना शुद्धा लक्षणा
iii) उपादान शुद्धा लक्षणा
iv) लक्षण लक्षणा शुद्धा

3) व्यंजना :→

काव्यामध्ये व्यंजना शब्दशक्तीला महत्वाचे स्थान आहे. काव्यात शब्दाचा वाच्यार्थ वेगळाच अर्थ प्राप्त होतो. काव्यात कवी व्यापार काव्यसौंदर्य व्यंजना व्यापार होतो. मुख्य अर्थाला वाच्यार्थाविरुद्ध वेगळ्या अशा रमणीय अशा अर्थदर्शनाय निर्माण होतात. तेव्हा त्यांना व्यंग्यार्थ म्हणतात. उदा. समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत. या वाक्यात लेखकाला किंवा हे उच्चारणाऱ्या व्यक्तीला 'साप' या शब्दाचा वाच्यार्थ केवळ अभिप्रेत नाही 'साप' या शब्दातून 'दुष्ट' माणसे असा अर्थ यातून ध्वनित होतो. दुसरा एक अर्थ सुचवायचा आहे. म्हणजे मूळ अर्थाला बाधा न आणता दुसरा अर्थ सुचवण्याचा आहे म्हणजे मूळ अर्थाला बाधा

—xox———oxo———xox—